# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## सोमवार, दिनांक १४ जुलै, २०२५

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे –**

(क) **तारांकित प्रश्न**

(ख) **दिनांक ३० जून, २०२५ रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे –**

**उच्च व तंत्रशिक्षण मंत्री :**

**(क)** "कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा चौतीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा प्रथम वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** "संजय घोडावत विद्यापीठ, कोल्हापूर यांचा सन २०२२-२०२३ व सन २०२३-२०२४ या वर्षांचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** "एम आय टी आर्ट, डिझाइन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठ, पुणे यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ड.)** "विश्वकर्मा विद्यापीठ, पुणे यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने –**

(१) **श्री.सुनिल शिंदे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १६ वर उप मुख्यमंत्री (नगरविकास) निवेदन करतील :-**

मुंबईतील कबुतरखाने बंद केल्यानंतर कबुतरे निवासी इमारतीत आश्रय घेण्याची शक्यता असल्याने त्यांना विजनवासात सोडण्याबाबत ठोस उपाययोजना हाती घेण्याबाबत.

असुधारित प्रत

(२) **श्री.अरुण लाड, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १८ वर उप मुख्यमंत्री (नियोजन) निवेदन करतील :-**

राज्यातील ३६ पैकी एकाही जिल्हा नियोजन समितीला राज्य शासनाकडून मागील तीन महिन्यापासून निधी मिळाला नसल्याबाबत.

(३) **श्री.सत्यजीत तांबे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १५ वर पणन मंत्री निवेदन करतील:-**

महाराष्ट्रात दरवर्षी सुमारे २५ लाख मेट्रिक टनांहून अधिक कांद्याचे उत्पादन होत असून सुमारे १८ ते २० लाख शेतकरी कुटुंबे कांदा शेतीशी थेट जोडलेली असताना, कांद्याच्या भावातील सततची चढउतार, वाहतूक, निर्यातबंदी आणि साठेबाजांच्या अडचणी यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याबाबत.

(४) **श्री.शशिकांत शिंदे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १७ वर आदिवासी विकास मंत्री निवेदन करतील :-**

राज्यातील आदिवासी व दुर्गम भागात राहणाऱ्या हजारो कुपोषित बालके सहा वर्षाखालील बालके, गर्भवती स्तनदामाता व अंगणवाडीतील हजारो मुलांना "टेक होम रेशन" मिळत नसल्याबाबत.

(५) **श्री.अंबादास दानवे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १९ वर रोजगार हमी योजना मंत्री निवेदन करतील :-**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील फुलंब्री तालुक्यात 'मातोश्री पाणंद रस्ता योजना' अंतर्गत ३३ गावांतील ९६ कामांमध्ये मजुरांचा एकच ग्रुप फोटो पुन्हा पुन्हा वापरून सुमारे ५.१८ कोटी रुपयांची बिले उचलण्यात आली असणे, तसेच महिला मजूर कामावर असताना पुरुषांचे फोटो लावून केलेली अनियमितता.

**चार : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(शुक्रवार, दिनांक ११ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना)-[अनुक्रमांक (१) व (२)] —**

(१) **श्री.संजय केणेकर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महिला व बालविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात कुपोषण मुक्तीसाठी शासकीय आणि प्रशासकीय पातळीवर विविध योजना राबवणे, कार्यक्रम घेणे, जनजागृती करणे असे प्रयत्न होत

असताना कुपोषण कमी होत नसून राज्यात फेब्रुवारी महिन्यात १ लाख ८२ हजार ४४३ कुपोषित बालके असल्याची धक्कादायक माहिती माहे एप्रिल २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्या सुमारास समोर येणे, एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत राज्यात तब्बल २० हजार ४१४ पदे रिक्त असल्याचे आढळून येणे, त्याचबरोबर बालविकास अधिकारी, पर्यवेक्षिका, अंगणवाडी सेविका, मदतनीस यांचीही भरती रखडली असून त्याचे परिणाम ग्रामीण भागात उमटत असून लहान मुलांचे आरोग्य, पोषण आणि विकास याबाबतीत अडथळा निर्माण होणे, राज्यातील सर्वाधिक मुंबई उपनगर जिल्ह्यात १६ हजार ३४४ कुपोषित बालकांची संख्या असल्याची नोंद होणे, सदर रिक्त पदे तातडीने भरून कुपोषण मुक्त करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **श्री.राजेश राठोड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"आशिया खंडातील एक मोठे मासेमारी बंदर म्हणून ओळख असलेल्या मुंबईतील कुलाबा विभागात ससून डॉक नावाजलेले असणे, या ठिकाणी मासळीचा मोठा व्यापार चालत असून,बंजारा समाज येथे आपली रोजी रोटी कमावण्यासाठी आलेला असणे, या ससून डॉकमधून दरवर्षी हजारो कोटी रुपयांची मासळी परदेशी निर्यात होत असणे, निर्यात होण्यापूर्वी या मासळीचे काम हा आदिवासी समाज कित्येक वर्षापासून करत असणे, बोटीतून मासळी उपसणे, हाताच्या नखाने मासळी सोलणे,बोटीची निगा राखणे अशी अंगमेहनतीची अनेक कामे बंजारा समाजातील जवळपास २० हजार कामगार अहोरात्र मेहनत करत असणे, परंतु महत्वाच्या व्यापारपेठेतील हे कामगार अनेक मुलभूत सोयी सुविधांपासून वंचित राहत असणे, स्वातंत्र्योत्तर काळापासून वंचित राहिलेल्या व दुर्लक्षित असलेल्या या आदिवासी बंजारा समाजाला बोटीवरील हजारो टन निर्यातक्षम मासळी सोलणाऱ्या मुख्यत: महिला व पुरुष कर्मचाऱ्यांसाठी विश्रांती घेण्यासाठी व भोजन करण्यासाठी स्वतंत्र विश्रामगृहाची आवश्यकता, महिलांसाठी सुलभ शौचालयाची स्वतंत्र व्यवस्था, नवजात बालके आणिं लहान मुलांचा सांभाळ करण्यासाठी पाळणाघर, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वस्त दरातील शिवभोजन उपहारगृह व प्राथमिक शिक्षणासाठी बालवाडीची गरज, घनकचरा व्यवस्थापनाची व्यवस्था इत्यादी त्यांच्या मुलभूत मागण्या असून,त्या मागण्या मंजूर झाल्यास त्यांना दिलासा मिळेल,याकरीता शासनाने लक्ष घालून मासळी व्यवसायातील बंजारा कामगारांच्या समस्या सोडविण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व यावर शासनाची प्रतिक्रिया."

अग्रिम प्रत

(३) **श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री सदाशिव खोत, प्रसाद लाड वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पंडिता रमाबाई मुक्ती मिशन या संस्थेचा अनाथआश्रम हा केडगाव, ता.दौंड, जि.पुणे येथे असणे, या आश्रमात अंध, अपंग व अनाथ मुलींना शिक्षणासाठी रहिवास उपलब्ध असणे, परंतु या संस्थेकडून गरीब व असहाय्य मुली व महिला यांच्याकरीता सेवेच्या नावाखाली त्यांचे ख्रिश्चन धर्मामध्ये धर्मांतरण केले जात असल्याच्या तक्रारी प्राप्त होत असणे, अशा प्रकारे मुलींचे बळजबरीने धर्मांतरण होत असल्यामुळे दिनांक ०८ डिसेंबर, २०२३ रोजी अनुसूचित जातीच्या महिलेने या आश्रमाचे संचालक तसेच त्यांचे एजंट यांच्या विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल केलेला असणे, तसेच सदर संस्थेमधील मुलींचा विनयभंग केला म्हणून या संस्थेचा वित्तव्यवस्थापक याच्या विरुध्द गुन्हा दाखल केलेला असणे, या संस्थेतील अनियमितता तसेच सुरु असलेल्या बेकायदेशीर कृत्यांसंदर्भात महाराष्ट्राचे तत्कालीन गृहमंत्री यांनी सदर संस्थेच्या कामकाजाची चौकशी करण्यासाठी वरिष्ठ महिला पोलीस अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली विशेष चौकशी समिती स्थापन केली जाईल, असे आश्वासन दिलेले असणे, परंतु आजपर्यंत अशी कोणतीही समिती स्थापन केलेली नसणे, त्यामुळे सदरहू गंभीर प्रकरणात तात्काळ एस. आय. टी. स्थापन करणे तसेच सदर संस्थेची मान्यता रद्द करणे याबाबत शासनाची भूमिका व शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही."

(४) **सर्वश्री श्रीकांत भारतीय, धर्मगुरू राठोड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"लोणावळा ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीत दिनांक २५ मार्च, २०२५ रोजी हैदराबाद वरुन जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट, मुंबईच्या दिशेने निर्यातीसाठी घेऊन जात असलेले गोमांसाचे (सुमारे ५७ हजार किलो) २ कंटेनर ट्रक पकडण्यात आले असणे, सदर गोमांस मे. एशियन फुड्स मीम ॲग्रो या कंपनीकडून निर्यातीसाठी पाठविण्यात आलेले असणे, याबाबत प्राथमिक तपास व न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळा संचालनालयाच्या अहवालानंतर FIR No. ८५/२०२५ दिनांक ३० मार्च, २०२५ रोजी दाखल झालेला असणे, तसेच महाराष्ट्रातील धाराशीव जिल्ह्यामधून २० ते २५ टन गोमांस तेलंगणा राज्य येथे नियमितपणे तस्करी होत असल्याचे निदर्शनास येत असणे, अशा प्रकारे महाराष्ट्र राज्यात गोवंशीय प्राण्यांच्या कत्तलीस, विक्रीस व वाहतुकीस बंदी असुन सुध्दा राज्यभरामध्ये सर्रासपणे गोवंशाची अनधिकृत वाहतूक सुरु असणे, तसेच राज्यामध्ये गौतस्करी रोखण्यासाठी महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा, १९७६ (सुधारित १९९५) व प्राण्यांना निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध कायदा, १९६० नुसार गुन्हे नोंदविले जात असणे, सदर गुन्हा नोंद होत असताना अनधिकृतपणे गोमांसाची वाहतूक करणारी वाहने जप्त करण्याबाबत व वाहनांचा परवाना

अग्रिम प्रत

कायमचा रद्द करुन वाहन चालक व मालक यांच्यावर मोक्का अंतर्गत फौजदारी गुन्हा दाखल करणे तसेच गोतस्करी रोखण्यासाठी स्वतंत्र नवीन कडक कायदा हिवाळी अधिवेशनात मंजूर करणेबाबत शासनाची भूमिका व उपाययोजना."

(५) **श्री. प्रसाद लाड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"नॉर्थ कॅनरा गौड स्वारस्वत को-ऑपरेटिव्ह बँकेमध्ये कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याची बाब माहे जुलै, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात उघडकीस आलेली असणे, अवसायकाने गोठविलेल्या यू.बी.इंजिनिअरिंग कंपनीच्या खात्यातून अनेक खात्यांवर कोट्यवधी रुपये वळविले असून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करण्यात आलेला असणे, बँकेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष, संचालक मंडळ आणि पदाधिकाऱ्यांविरुध्द आर्थिक गुन्हे शाखेकडे तक्रार करण्यात आलेली असणे, तक्रार नोंदविल्यानंतर गुन्हयातून वाचविण्यासाठी बँकेच्या अध्यक्ष व उपाध्यक्षांनी आझाद मैदान पोलीस ठाण्यातील वरिष्ठ पोलीस निरिक्षक यांना मोठी रक्कम लाच स्वरुपात दिलेली असणे, आर्थिक देवाण-घेवाण झालेली असल्याने बँकेच्या अध्यक्ष, उपाध्यक्षांवर तसेच पदाधिकाऱ्यांवर कोणत्याही स्वरुपाची कारवाई होत नसणे, परिणामी बँकेच्या सभासदांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच पदाधिकारी यांची मालमत्ता जप्त करुन त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व याबाबतची शासनाची भूमिका."

(६) **श्री.एकनाथराव खडसे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील विविध प्रकल्पांसाठी शासनाने हजारो शेतकऱ्यांच्या लाखो हेक्टर जमिनी संपादित करणे, प्रकल्पासाठी शेतजमीन संपादन झाल्याने शेतकऱ्यांसमोर निर्माण झालेला रोजगाराचा प्रश्न, सदर प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांना नोकरभरतीमध्ये दिलेले ५ टक्के आरक्षण, २००९ पूर्वी सदर प्रकल्पग्रस्त बेरोजगारांना सरळसेवा भरतीने, जेष्ठता क्रमाने व शैक्षणिक पात्रतेनुसार भरती करणे, मात्र उच्च न्यायालयात दाखल याचिकेच्या निर्णयानंतर काढण्यात आलेल्या दिनांक २७ ऑक्टोबर, २००९ च्या शासन निर्णयाद्वारे सदर पदभरती ही जाहिरात देऊन सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवाराची पात्रता तपासून व स्पर्धा परिक्षेद्वारे करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय, सदर न्यायालयाच्या आदेशास पुनर्विचार याचिका दाखल करणे अथवा सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्याची आवश्यकता, राज्यातील बेरोजगार प्रकल्पग्रस्त यांची वाढती संख्या पाहता पाच टक्के आरक्षणातून नोकर भरती होणे अशक्य असल्याने त्यांचे आरक्षण हे पाच टक्के होऊन पंधरा टक्के करण्यासंबंधी मा. मुख्यमंत्र्यांनी अमरावती येथील प्रकल्पग्रस्तांच्या मेळाव्यात दिलेले आश्वासन, प्रकल्पासाठी

अप्रकाशित

शेती, घरे संपादित झाल्याने बेघर, निर्धन झालेल्या शेतकऱ्यांच्या पाल्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष, राज्य शासनाकडून अनुकंपा नोकरभरतीच्या धर्तीवर सरळसेवा पध्दतीने प्रकल्पग्रस्तांच्या ठेवलेल्या जेष्ठता यादीनुसार स्पर्धात्मक परिक्षेशिवाय प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्तांना सेवेत सामावून घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(७) **सर्वश्री सुनिल शिंदे , प्रसाद लाड, प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.**पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"मुंबईतील लोकसंख्येच्या तुलनेत शौचालयांची संख्या अत्यंत कमी असल्यामुळे त्याचा वापर प्रमाणापेक्षा अधिक नागरिकांना करावा लागत असल्याची गंभीर बाब  प्रजा फाऊंडेशनने नुकत्याच जाहीर केलेल्या अहवालातील आकडेवारीवरून समोर येणे, मुंबईत पुरुषांसाठी असलेल्या एका सामुदायिक शौचालयाचा वापर ८६ पुरुष करत असून स्त्रियांसाठी असलेल्या एका शौचालयाचा वापर ८१ स्त्रियांकडून करण्यात येणे, सन २०२३ च्या आकडेवारीनुसार मुंबईतील एकूण शौचालयांपैकी ६८०० शौचालयांमध्ये पाणी व वीज जोडणी नसून दर चार सार्वजनिक शौचालयांपैकी केवळ एक शौचालय स्त्रियांसाठी असणे, शहरात एका सार्वजनिक शौचालयाचा वापर करणाऱ्या पुरुषांची संख्या ७५२ असून स्त्रियांची संख्या १८२० असणे, एकूणच सार्वजनिक शौचालये झोपडपट्टीवासीयांच्या संख्येच्या तुलनेने अपुरी असून महिला वर्गाला त्याचा अधिक त्रास सहन करावा लागणे, ‘स्वच्छ भारत अभियाना’ च्या मापदंडाच्या तुलनेत हे प्रमाण खूपच जास्त असणे, अनेक ठिकाणी मूलभूत सुविधांची वानवा असून  मुंबईतील ६९ टक्के सार्वजनिक शौचालयांमध्ये पाण्याची जोडणी करण्यात आलेली नसणे,  तसेच ६० टक्के शौचालयांमध्ये वीज उपलब्ध नसणे, मुंबईकर नागरिकांना स्वच्छता सुविधा उपलब्ध करून देणे ही मुंबई महानगरपालिकेची जबाबदारी असतानाही गेल्या दोन वर्षांपासून पालिकेचा कारभार लोकप्रतिनिधींविना सुरु असल्याने नागरिकांच्या मुलभूत प्रश्नांबाबत चर्चा आणि उपाययोजना न होणे, परिणामी मुंबईकर जनतेत शासनाप्रती पसरलेली तीव्र नाराजीची भावना, यास्तव मुंबईतील शौचालयांची लोकसंख्येच्या तुलनेत संख्या वाढविण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(८) **श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"मुंबईतील बोरीवली येथील साईबाबा नगर लेआउट  एकूण १९,१८७.२७ चौ.मी. क्षेत्रफळ असलेल्या भूखंडांवर विकास योजनेमध्ये  या भूखंडांचा एफएसआयचा वापर करून साईबाबा नगर लेआउटमध्ये १८ इमारती उभारण्यात

अग्रिम प्रत

येणे, विकास आराखडा २०३४ नुसार हे भूखंड उच्च शिक्षण संस्था, पालिका शाळा, दवाखाना, वृद्धाश्रम, केअर सेंटर, मैदान व इतर सार्वजनिक उपयोगासाठी राखीव असणे, उक्त भूखंड महापालिकेच्या ताब्यात असूनही नोंदणीकृत कागदपत्रांद्वारे खाजगी विकासकाला विकण्यात येणे, सार्वजनिक उपयोगासाठी राखीव असलेले महापालिकेचे भूखंड विकण्यात येणे, दिनांक १५ मे, २०२५ रोजी सहाय्यक आयुक्त यांनी सीटीएस क्रमांक ४/१ ते ४/१८ वर स्टॉप वर्क आदेश जारी करणे, साईबाबा नगरमधील सर्व १८ इमारती ४५ वर्षांहून अधिक जुन्या असून जर्जर स्थितीत असणे, ४०० हून अधिक भाडेकरूंनी पुनर्विकासासाठी आपले घर रिकामे केले असणे व भाड्याच्या घरांत राहत असणे, या प्रकरणात दोष नसलेल्या निरपराध रहिवाशांवर काम थांबवण्याचा आदेश लागू करणे, दिनांक १४ जानेवारी, २०२५ रोजी वरील महापालिकेचे भूखंड विकासकाने नोंदणीकृत दस्तऐवजाद्वारे विकले असणे, महापालिकेच्या दुर्लक्षामुळे हजारो रहिवाशांचे नुकसान होणे, ही अत्यंत गंभीर फसवणूक व अपहार असणे, खरेदी-विक्री करणाऱ्यांविरोधात कडक कायदेशीर कारवाई करुन त्याचप्रमाणे असे दस्तऐवज नोंदवण्यात आलेल्या संबंधित अधिकारी व विभागांवरही चौकशी करून फौजदारी कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(९) **सर्वश्री सत्यजीत तांबे, अंबादास दानवे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात बोगस डॉक्टरांकडून वैद्यकीय व्यवसाय सुरू असल्यामुळे रुग्णांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण होण्याची अनेक प्रकरणे सातत्याने निदर्शनास येत असणे, अहिल्यानगर, नाशिक, जळगावसह, मुंबई आदी ठिकाणी अनधिकृतरित्या औषधोपचार करणारे, वैद्यकीय शिक्षण अथवा नोंदणी नसलेले व्यक्ती मोठ्या प्रमाणात सापडले असणे, महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने 'Know Your Doctor' QR-कोड प्रणाली, मोबाइल ॲप आणि तपासणी मोहिमा अशा माध्यमांतून वैध डॉक्टरांची ओळख निश्चित करण्याचा प्रयत्न सुरू केला असणे, मात्र ग्रामीण भागात या उपायांची प्रभावी अंमलबजावणी होत नसणे, विशेषत: आदिवासी बहुल लोकसंख्या असलेल्या भागात बोगस डॉक्टरांकडून दिले जाणारे चुकीचे उपचार, औषधांचे गैरप्रकार हे गंभीर संकट बनत असणे, पोलिसांना थेट कारवाईचे अधिकार नसणे, कारवाई दरम्यान राजकीय दबाव व इतर कायदेशीर अडचणी येणे, त्यामुळे राज्य सरकारने सन २०२२ मध्ये बोगस डॉक्टरांविरुद्ध बोगस वैद्यकीय व्यवसायावरील कडक कायदा आणण्याची घोषणा केलेली असणे, मात्र याबाबतीत कोणतीही प्रगती झाली नसणे, केवळ अधूनमधून छापे मारण्याऐवजी नियमित तपासणी, जनजागृती व कायद्यात कठोर सुधारणा करणे आवश्यक असणे, तेलंगणातील TSMPR कायद्याच्या धर्तीवर महाराष्ट्रातही विशेष कायदा करून पोलिसांना कारवाईचे अधिकार देणे, नोंदणी बंधनकारक

करणे तसेच स्थानिक पातळीवर तपासणी समित्या निर्माण करणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना."

(१०) **डॉ.मनिषा कायंदे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"कष्टकरी विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी देण्यासाठी राज्यात अनुदानित रात्रशाळा व कनिष्ठ महाविद्यालये सुरू असणे, अध्यापन कालावधी केवळ २.३० ते ३ तासांचा असल्याने गोळीबंद शिक्षण देण्यासाठी सेवा शर्ती नियम १९८१ मधील नियम २२ (२) (ग) आणि २३ (१)(ब ) नुसार दिवस शाळांमधील अनुभवी दुबार शिक्षकांची नेमणूक केली जाणे व त्यांना अर्धवेळ वेतन मानधन म्हणून दिले जाणे, काही संस्थांनी व अधिकाऱ्यांनी एकल शिक्षकांच्या नेमणुका करून अर्धवेळ ऐवजी पूर्णवेळ वेतन देणे, बेकायदेशीर कृती करून शासनाची आर्थिक फसवणूक करणे, अर्धवेळ शिक्षकांना पूर्णवेळ वेतन देण्याला स्थगिती देण्याची आवश्यकता असणे, पूर्णवेळ वेतनाकरिता शिक्षण निरीक्षक व वेतन अधिकारी यांना जबाबदार धरणे, जे दुबार शिक्षक रात्र शाळा व कनिष्ठ महाविद्यालयात कार्यरत होते त्यांना तात्काळ मूळ पदावर घेण्याची प्रक्रिया पूर्ण करणे किंवा अन्य रात्र शाळा व रात्र कनिष्ठ महाविद्यालय अर्धवेळ कनिष्ठ महाविद्यालयातील निवृत्त शिक्षकांच्या रिक्त पदांवर सामावून घेणे, रात्र शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील रिक्त अर्धवेळ पदांवर नवीन अनुभवी दुबार शिक्षकांची व दुबार मुख्याध्यापकांची पोर्टल शिवाय नेमणूक करण्यास संस्थांना परवानगी देणे, यासाठी आवश्यक ती दुरूस्ती करून दिनांक ३० जून, २०२२ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करणे, वंचित विद्यार्थ्यांना शिक्षण प्रवाहात आणणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(११) **श्री.संजय खोडके, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पणन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती यांना जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अमरावती यांच्या प्रशासकीय मान्यतेनुसार ४४ लक्ष रुपयांची कामे व ३ विद्युत कामांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली असताना सदर कामे शासनाच्या खरेदी प्रक्रियेनुसार न करता त्यामध्ये अनियिमितता घडवून शासनाची कार्यप्रणाली डावलून मोठ्या प्रमाणात अपहार केल्याबाबत शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष, सचिव यांनी विभागीय आयुक्त, अमरावती, जिल्हाधिकारी अमरावती यांचेकडे जानेवारी, २०२५ मध्ये केलेल्या लेखी तक्रारी, त्यामध्ये विशेषत: कृषी उत्पन्न समितीने विद्युत कामामध्ये ई-निविदा कार्यप्रणाली न राबविता एका कामाचे अनेक बनावट प्राकलन तयार करुन नियमबाह्य शासकीय निधीचा केलेला दुरुपयोग, साफ-सफाई ठेक्यामध्ये झालेला भ्रष्टाचार, कृषी उत्पन्न बाजार समितीने तक्रार मुद्द्यावर अपूर्ण खोटा, चुकीचा व दिशाभूल करणारा

अग्रिम प्रत

सादर केलेला खुलासा, याबाबत चौकशी करुन संबंधितांवर गुन्हे दाखल करणे व पैश्याची वसूली करणे गरजेचे आहे, या अनुषंगाने चौकशी करण्याकरिता उपनिबंधक सहकारी संस्था, अमरावती व लेखा परिक्षक, अमरावती यांची गठीत करण्यात आलेली चौकशी समिती, त्यानुसार या समितीने अहवाल सादर करुन त्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही करणे आवश्यक असताना,अद्यापही कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात न आल्यामुळे शेतकऱ्यांत पसरलेला असंतोष लक्षात घेता शासनाने याप्रकरणी वरिष्ठ पातळीवर सखोल चौकशी करुन संबंधित दोषींवर करावयाची आवश्यक ती कार्यवाही व शासनाची भुमिका."

**पाच : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास)**

**सहा : शासकीय विधेयके —**

**विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

**(क)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७६ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, सतेज उर्फ बंटी पाटील, शशिकांत शिंदे, सचिन अहिर, एकनाथराव खडसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७६ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ख)** सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७७ - महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण (सुधारणा) विधेयक, २०२५

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, सतेज उर्फ बंटी पाटील, शशिकांत शिंदे, सचिन अहिर, एकनाथराव खडसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७७ - महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण (सुधारणा) विधेयक, २०२५" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

-----------------------------------------------------------------------

अप्रकाशित प्रत

**सात : म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

(१) **(मंगळवार, दिनांक ८ जुलै, २०२५, बुधवार, दिनांक ९ जुलै, २०२५, गुरुवार, दिनांक १० जुलै, २०२५ व शुक्रवार, दिनांक ११ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव)** —

**सर्वश्री सदाशिव खोत,** हेमंत पाटील, विक्रम काळे, प्रविण दरेकर, डॉ. मनिषा कायंदे, सर्वश्री अमोल मिटकरी, प्रसाद लाड, श्रीमती भावना गवळी, श्री संजय खोडके, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री कृपाल तुमाने, इद्रिस नायकवडी, श्रीकांत भारतीय, किशोर दराडे, पंकज भुजबळ, श्रीमती चित्रा किशोर वाघ, सर्वश्री चंद्रकांत रघुवंशी, किरण सरनाईक, डॉ. परिणय फुके, सर्वश्री संदीप जोशी, दादाराव केचे, संजय केणेकर, योगेश टिळेकर, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री विक्रांत पाटील, अमित गोरखे, वसंत खंडेलवाल, ज्ञानेश्वर म्हात्रे, रणजितसिंह मोहिते-पाटील, धर्मगुरू राठोड, राजहंस सिंह, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव - (चर्चा पुढे सुरु )**

"राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्र केंद्रस्थानी ठेऊन सिंचन क्षेत्राकडे विशेष लक्ष देण्याचा शासनाचा प्रयत्न असणे, कृषी क्षेत्रात कृत्रिम बुध्दिमता (ए-आय) तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे धोरण अंमलात आले असणे, जलयुक्त शिवार योजना, नदीजोड प्रकल्प आणि रखडलेल्या सिंचन योजनांच्या माध्यमातून कृषी सिंचन वाढविण्यावर भर देण्यात आला असणे, विदर्भातील वैनगंगा-पैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प पूर्ण झाल्यास १० लाख एकर जमिन ओलिताखाली येण्याची शक्यता असणे, नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पामुळे नाशिक व जळगाव जिल्हयातील ४९,५१६ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ होणार असणे, दमणगंगा-एकदरे-गोदावरी या २३०० कोटी रुपये किंमतीच्या नदीजोड प्रकल्पामुळे ३.५५ टीएमसी पाणी उपलब्ध होणार असणे, तापी महापुनर्भरण या १९,३०० कोटी रुपये किंमतीच्या सिंचन प्रकल्पामुळे उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम विदर्भातील खारपाण पट्ट्यातील शेतकऱ्यांना लाभ होणार असणे, महाकृषी विकास अभियान अंतर्गत केवळ १ रुपयात राबविण्यात येणाऱ्या पिक विमा योजनेत नियमितता ठेवण्याच्या दृष्टीने कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी अधिक सतर्क होण्याची आवश्यकता, अटल भूजल योजना अधिक गतीमान करण्याची आवश्यकता, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२ ला मंत्रीमंडळाची मान्यता मिळणे, कोकणातील उल्हास आणि वैतरणा नद्यांच्या खोऱ्यातून ५४.७० टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याचा प्रकल्प प्रस्तावित असणे, राज्यात शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्वाचे पांदण रस्ते तातडीने पूर्ण करण्याकरिता "मातोश्री पांदण रस्ते योजना" अधिक सुटसुटीत करुन राबविण्याची आवश्यकता, राज्यात सन २०२४-२०२५ च्या हंगामांतर्गत सोयाबीन, तूर, ज्वारी, चना, कापूस

अग्रिम प्रत

इत्यादी धान खरेदी झाली असणे, शासकीय खरेदी योजनेतील अनियमितता टाळण्यासाठी योजना सक्षम करण्याची आवश्यकता, राज्यात काही गावांतील शेतकऱ्यांना डिजिटल पध्दतीने देण्यात येणारे लाभ मिळण्यात असलेल्या अडचणी दूर करण्याची आवश्यकता, "मॅगनेट २.०" अंतर्गत कृषी व्यवसायाला चालना देण्यासाठी विशेष योजना हाती घेण्यात आली असणे, ऊर्जा वापराला प्रोत्साहन देतानाच ऊर्जा निर्मितीवर भर देण्यात येत असणे, १६००० मेगावॅट क्षमतेच्या सौरऊर्जा प्रकल्पांना गती देण्याचे धोरण आखण्यात येणे जेणेकरुन, शाश्वत व स्वच्छ ऊर्जा मिळेल आणि औद्योगिक क्षेत्राला त्याचा फायदा होईल, राज्यातील सर्व शासकीय इमारती सन २०२५ या वर्षाच्या अखेरपर्यंत संपूर्णपणे सौरऊर्जेद्वारे विद्युतीकरण करण्याचे धोरण असणे, शेतकऱ्यांना सिंचनासाठी सौर कृषीपंप उपलब्ध करुन देणारी "मुख्यमंत्री सौर कृषी योजना" राज्यात प्रभावीपणे राबविण्यात येत असणे, सौर ऊर्जेचा वापर वाढवून शाश्वत शेतीला प्रोत्साहन देण्याचे शासनाचे उद्दिष्ट असणे, महाराष्ट्र देशासाठी रोल मॉडेल व्हावे व राज्यातील शेतकरी सुजलाम-सुफलाम व्हावा यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **(गुरुवार, दिनांक १० जुलै, २०२५ व शुक्रवार, दिनांक ११ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**सर्वश्री अंबादास दानवे,** सतेज पाटील, एकनाथराव खडसे, ॲड.अनिल दत्तात्रय परब, सर्वश्री अभिजित वंजारी, शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, सर्वश्री जयंत आसगावकर, जगन्नाथ अभ्यंकर, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री धीरज लिंगाडे, राजेश राठोड, सुधाकर अडबाले, अरुण लाड, वि.प.स. **यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव :- (चर्चा पुढे सुरु )**

"राज्यात आदिवासी विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांत गंभीर त्रुटी असणे, आदिवासी आश्रमशाळांमध्ये शिक्षकांची व कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त असून शिक्षणाचा दर्जा घसरलेला असणे, अनेक आदिवासी पाड्यांमध्ये रस्ते, वीज, पाणी, आरोग्य व शिक्षणाच्या मूलभूत सुविधा अद्याप उपलब्ध नसणे, निधीअभावी योजनांची गतीने व प्रभावी अंमलबजावणी होत नसणे, अपघातग्रस्त रुग्णांना वेळेवर प्राथमिक उपचार मिळत नसणे, शासकीय रुग्णवाहिका वेळेवर पोहचत नसून अनेक जिल्ह्यांतील रुग्णवाहिका दुरुस्ती अभावी बंद अवस्थेत असणे, त्यामुळे नवजात बालके व माता यांच्या मृत्यूचे प्रमाण वाढले असून रस्त्यावरील प्रसूतीच्या घटनांमध्येही वाढ झालेली असणे, शासकीय रुग्णालयांमध्ये वैद्यकीय अधिकारी, परिचारिका व अन्य कर्मचाऱ्यांची असंख्य पदे रिक्त असणे, अनेक वैद्यकीय अधिकारी ग्रामीण भागात सेवा देण्यास नकार देत असल्याने या भागातील आरोग्य व्यवस्था कोलमडली असणे, जन आरोग्य योजनेंतर्गत अनेक रुग्णालयांनी उपचार नाकारल्याच्या घटना घडत

अप्रकाशित

असणे, राज्यातील रक्तपेढ्यांवरील रक्ताच्या कमतरतेमुळे अनेक रुग्णांना मृत्युला सामोरे जावे लागणे, त्यामुळे राज्यातील सर्व रक्तपेढ्यांची तपासणी करुन सदरहू रक्तपेढ्या चोवीस तास चालू ठेवण्याची आवश्यकता, धर्मादाय रुग्णालय राज्याच्या नियमांचे सर्रास उल्लंघन करीत असून गरजू रुग्णांना प्रवेश रद्द, आगाऊ रकमेची मागणी व वचनबध्द सुविधा देण्यास जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणे, वैद्यकीय महाविद्यालयांतील संरचना, कर्मचारी व औषधसाठा यांचा दर्जा अत्यंत निकृष्ट दर्जाचा असणे, कमी कन्टेन्टच्या व बोगस औषधांचा पुरवठा शासकीय रुग्णालयात होत असणे, राज्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या भुखंड वाटपामध्ये झालेली अनियमितता, भूखंडांचा वापर उद्योगासाठी होणे आवश्यक असताना निवासी वापराकरिता खाजगी विकासकांना देण्यात येणे, उद्योजकांना आवश्यक सोयी सुविधा देण्यास जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याने अनेक उद्योग इतर राज्यात स्थलांतरीत झालेले असणे, जल जीवन मिशन योजनेंतर्गत झालेल्या कामांमध्ये अनियमितता, निकृष्ट दर्जाचे साहित्य, अपूर्ण पाइपलाइन आणि अपारदर्शक खर्च यामुळे हजारो गावांना आजही सुरक्षित पाणीपुरवठा होत नसणे, राज्याच्या प्रगतीचा पाया असलेल्या तरुण पिढीसाठी रोजगाराच्या संधी कमी होत असून शासकीय विभागातील भरती प्रक्रिया प्रलंबित असल्याने विविध संवर्गातील ३ लाख पदे रिक्त असणे, याबाबत शासनाकडून वेळोवेळी आश्वासने देऊनही रिक्त जागा भरण्यास होत असलेले दुर्लक्ष, त्यातच सरकारने निवृत्त अधिकाऱ्यांना राज्यातील सरकारी विभागात कंत्राटी पध्दतीने नियुक्ती देण्यासाठी योजना सुरु केली असणे, उक्त योजनेस बेरोजगार तरुणांचा असलेला विरोध, या सर्व प्रश्नांकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका".

**आठ : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

**(१) सर्वश्री रणजितसिंह मोहिते-पाटील, शशिकांत शिंदे, ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"भीमा खोऱ्यातील वाढत्या पाण्याची मागणी पूर्ण करण्यासाठी आणि कृष्णा खोऱ्यातील अतिरिक्त पाणी वळविण्यासाठी शासनाने २००४ मध्ये कृष्णा-भीमा स्थिरीकरण योजना मंजूर केली असणे, या योजनेच्या कामाचा शुभारंभ करण्यात येणे, परंतु या योजनेला अद्याप गती मिळाली नसणे, कृष्णा खोऱ्यात शासनाने अनेक उपसा सिंचन योजना मंजुर केल्या असणे, त्यापैकी अनेक योजनांना "शाश्वत" पाणी कृष्णा-भिमा स्थिरीकरण योजना पूर्ण झाल्यावरच मिळणार असणे, या योजनेचा मुख्य उद्देश कृष्णा खोऱ्यातील अतिरिक्त पाणी भीमा खोऱ्यात आणून सातारा, सांगली, सोलापूर, पुणे,

अप्रकाशित

धाराशिव, बीड या जिल्ह्यांमधील ३१ तालुक्यांतील पाण्याची तीव्र टंचाई दूर करणे, याकरिता भूगर्भातील पाण्याची पातळी सुधारुन जलसाठा वाढेल तसेच कृषी क्षेत्रातील उत्पन्न वाढून बेरोजगारी कमी होईल, स्थलांतरण थांबेल आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न सुटण्यास मदत होईल, तसेच कोल्हापूर आणि सांगली भागांत पावसाळ्यात उद्‌भवणाऱ्या पूर परिस्थितीमुळे होणारे नुकसानही टाळता येईल, त्यामुळे भीमा खोऱ्यातील विशेषतः उजनी धरणाच्या वरच्या भागातील पाण्याच्या वाढत्या मागणीमुळे इतर नद्यांमधून पाणी भीमा नदी व उजनी धरणात वळविणे आवश्यक असणे, याकरिता कृष्णा-भीमा स्थिरीकरण योजनेस गती देऊन त्याची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

(२) **सर्वश्री सत्यजित तांबे, किशोर दराडे, विक्रम काळे, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यात दररोज सुमारे ९३०० नव्या वाहनांची नोंद होत असून, या वाढत्या वाहनभारामुळे राज्यातील महानगरांमध्ये एका तासात केवळ १८.५० कि.मी. अंतर कापता येणे शक्य होत असणे, वाहतूक कोंडीचा दर गेल्या ६ महिन्यांत ९०.८४ % ने वाढलेला असून, याकरिता रस्त्यांची अपुरी रुंदी व त्यावरील अतिक्रमण, अपूर्णावस्थेतील उड्डाणपूल, अपुऱ्या पार्किंग सवलती व स्मार्ट सिग्नल व्यवस्थेचा अभाव इ. बाबी जबाबदार असल्याचे स्पष्ट होणे, त्यामुळे महानगरातील मेट्रो रेल्वे प्रकल्पाचे काम लवकरात लवकर पूर्ण करून नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा जास्तीत जास्त उपयोग करावा यासाठी शासनाने प्रोत्साहनपर उपक्रम राबविणे आवश्यक असणे, याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

अस्वाक्षरित प्रत

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ११ जुलै, २०२५

**डॉ. विलास आठवले**
सचिव - ३,
महाराष्ट्र विधानपरिषद